
# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष २ ले. अंक १० वा. नवी मुंबई  दिनांक १ ते ३० एप्रील २०१३ पाने १६ किंमत २० रूपये

## जमा-खर्च पाण्याचा आम्ही कधी मांडलाच नाही


# दुष्काळ आवडे सरकारला ...



## माहिती अधिकार कार्यकर्त्यांना मोफत सरंक्षण द्या



## शासनाला उच्च न्यायालाचे आदेश !



## आमदार -खासदार विकास निधी बंद करा

## प्रत्येक गावाला ग्रामसभा विकास निधी द्या

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक
# नागरिक अधिकार

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

किरण मांजरेकर (मुंबई)
प्रमोद लक्ष्मण कदम(मुंबई)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
राजेश बने (रायगड)
प्रीतम यादव (सातारा)
डॉ.नृसिंह भस्मे (कोल्हापूर)
अजित कोठारी (जालना)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : नागरिक अधिकार
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com
: web site :
rtimahasangh.weebly.com

संपादकीय...........

## दुष्काळाचे लोणी कोणाच्या तोंडात ?

महाराष्ट्रातील संपूर्ण मराठवाडा,उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि पं.महाराष्ट्रातील सोलापूर,माण,खटाव अहमदनगर अन्य काही भागात तीव्र दुष्काळ आहे.भीषण पाणी टंचाई हे या दुष्काळातील वास्तव व स्थूल लक्षण आहे.पाऊस फारच कमी झाल्याने पिके वाळून गेली.हातात काहीच राहिले नाही.पेरणी व मशागतीसाठी घेतलेली कर्जे आणि उसणवारी फेडता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.अगोदर पाऊस पडेना म्हणून आभाळाकडे डोळे लावून बसलेले शेतकरी आता मायबाप सरकार काहीतरी देईल यासाठी सरकारकडे डोळे लावून बसले आहेत.सरकारी घोषणांचा पाऊस तर पडला आहे.परंतु शेतकऱ्यांच्या हातात काय आणि किती पडेल या विषयी शंकाच आहे. दुष्काळाच्या नावाने येणारे मदतीचे लोणी प्रशासनातील बोकेच अधिक मटकावतात हा यापूर्वीचा अनुभव आहे.राजकीय नेत्यांच्या अधिकारी मंडळीचे शिसे भरून सर्व पक्षीय राजकीय धेंडांनी राज्यात टँकर लॉबी उभी केली आहे.पाण्याच्या नावाखाली पाण्यासारखा पैसा वाहवला जाणार आहे.दुष्काळाने तहानलेले घसे कोरडे राहिले तरी चालेल परंतु टँकर माफियांचे शिसे ओले झाले पाहिजेत हाच आता यांच्या विषयपत्रिकेवरील प्राधान्यांचा क्रम असणार आहे.जनावरांच्या तोंडातील चाऱ्यांचा घास छावणी चालक चोरीत आहेत.छावणीतील शेण ही त्यांना पुरणार नाही.

दुष्काळ तर पडला आहे.ही समस्या आपण आव्हान म्हणून स्विकारू, पाण्याचा योग्य वापर,मदतीचे पारदर्शी व न्याय वाटप, दुष्काळ हटविण्यासाठी कायमस्वरूपी योजनाची आखणी व अंमलबजावणी, अपूर्ण सिंचन प्रकल्प निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याची धडक मोहिम व या सर्व कामात जनतेचा थेट व काही अधिकारासह सहभाग असा व्यापक कार्यक्रम आखून या दुष्काळावर मात करता येईल परंतु सरकार आणि प्रशासनाची तशी इच्छाशक्तीच नाही.दुष्काळी मदतीचे लोणी कोण किती हणणार यावर सर्वांचा डोळा आहे.




# दुष्काळ आवडे सरकारला ....

## जमा-खच पाण्याचा आम्ही कधी मांडलाच नाही



## पाणी आणि सामाजिक न्यायाचा हक्क

भारतात पेयजल पूरवठा करण्यासाठी अनेक योजना आणि त्यांच्या अंमलअजावणकरीता यंत्रणा उपलब्ध आहेत.संस्थात्मक पातळीवर राजीव गांधी पेयजल मोहिम आणि धोरणात्मक पातळीवर वेगवर्धीते ग्रामीण पाणीपूरवठा कार्यक्रम मार्गदर्शक तत्वानी पाण्याच्या उपलब्धतेशी निगडीत मुद्याकडे लक्ष वेधून घेण्यात मोठे योगदान दिले आहे.या मार्गदर्शक तत्वानुसार प्रतिव्यक्ती केवळ पिण्यासाठी आणि घरगुती वापरासाठी रोज ४० लिटर पाणी आवश्यक असल्याचे प्रमाणित करण्यात आले आहे.या निकषाचे खालील प्रमाणे विभाजन करण्यात आले आहे. हेतू व परिमाण लिटरमध्ये पिण्याकरीता ३ लिटर, स्वयंपाकाकरीता ५ लिटर अंघोळीकरिता १५ लिटर, भांडी घासणे व घरातील स्वच्छतेसाठी ७ लिटर, व्यक्तीगत स्वच्छतेकरिता १० लिटर स्त्रोत एआरडब्लूएसपी मार्गदर्शक तत्वे



# जमा-खर्च पाण्याचा आम्ही कधी मांडलाच नाही

पाणी साठवायचे व हिशोबाने उपयोगात आणायचे हे आम्ही गंभीरपणे मनावर घेत नाही मग चंटाई निर्माण झाली की केवळ सरकारच्या नावाने खडे फोडायचे हे आता बंद करून पाणी ही संपत्ती आहे तिचे जतन थेंब थेंब साठवून केले पाहिजेत



तथापि शासनाच्या योजना आणि धोरणे पुरेशी नाहीत.पाण्याच्या मानवआधिकारा संदर्भात स्पष्ट विधान व्हायला हवे. जेणे करून उपकार म्हणून नव्हे तर एक हक्क म्हणून पाण्याची मागणी सर्वांना करता येईल.

पाण्याच्या हक्कासंबधी भारतीय संविधानात किंवा संविधानाच्या मार्गदर्शक तत्वात स्पष्ट व पुरेसे विवेचन आलेले नसले तरी भारतीय संविधानाच्या कलम २१ अन्वये सन्मानाने जगण्याच्या हक्कात पुरेसे व स्वच्छ अन्न,पाणी उपलब्ध होणे हा मूलभूत मानवी अधिकार आहे.असे आपल्याला गृहित धरता येईल.या बाबत न्यायालयानी वेळोवेळी अनेक निकालात कायद्याच्या अर्थ स्पष्ट केलेला दिसून येतो.१९९० मध्ये केरळ उच्च न्यायालयाने अटटाकोया थंगल विरूद्ध भारत सरकार या निवाडयात म्हटले आहे की पेयजलाचा हक्क जगण्याच्या अधिकारात समाविष्ट आहे.नर्मदा बचाव आंदोलन खटल्यात (२०००/१०एमसीसी ६६४) सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की मानवाच्या जगण्यासाठी पाणी ही अगदी मूलभूत गरज आहे.आणि भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ मध्ये नमूद केलेल्या मानव अधिकाराशी पाण्याची गरज व निकड जोडून पुरेशा व स्वच्छ पाणी स्त्रोता सह जगण्याचा अधिकार अधोरेखीत करण्यात आला आहे.जेथे पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नाही तेथे तो उपलब्ध करून देवूनच त्याची पूर्तता केली जावू शकते.सर्वोच्च न्यायालयाने पाण्याच्या हक्काची पुरेशा पेयजलाच्या उपलब्धतेची तरतूद असलेल्या आंतरराष्ट्रीय कायद्यांमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या पाण्याच्या मानवी हक्कांशी सांगड घातली आहे.

# टँकरने होत असलेल्या पाणीपूरवठयाचा हिशोब मागा
# आरटीआय च्या माध्यमातून पाणीच्या भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवा

केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी
पंचायत समिती तथा गट विकास अधिकारी कार्यालय
-----------------------------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :-------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :-------------------------------------------

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :(विषय व कालावधी)
----------- या गावातील टँकरद्वारे होत असलेला /झालेल्या पाणी पूरवठा ची माहिती खालील मुद्येनिहाय माहिती मिळणेबाबत

अ) ---------- गावात २०१२ व २०१३ या वर्षात किती दिवसापासून टँकरदवारे पाणीपुरवठा होत आहे.आज पर्यंतचा कालावधी द्यावा.

ब ) पाणी पूरवठा करणाऱ्या कंत्राटदारांचे नाव व पत्ता द्यावा.शासन आणि पाणी पूरवठादार टँकर कंत्राटदार यांच्या झालेल्या कराराची सत्यप्रत द्यावी.

.

क) गेल्या तीन महिन्यापासून आमच्या गावात रोज किती टँकर खेपा टाकल्या रोजचा अहवाल द्यावा.

ड) .पाण्याचा स्त्रोत ते गाव हे अंतर किती आहे ?प्रती खेप प्रती टॅकर किती रूपये मोबदला ठरला आहे.

इ) .कंत्राटदाराला आजपर्यंत किती रूपये मोबदला दिला गेला आहे.रक्कम व अदा केलेला दिनांक असा तपशील द्यावा.

४) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीशः घेऊन जाईन.

५) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (सोबत १० रूपयाची पोस्टल ऑर्डर जोडली आहे)

ठिकाण : -------------
अर्जदाराची सही

दिनांक / / २०१३

नाव -----------------

हक्क कधीही मागून मिळत नाहीत ते मिळवावे लागतात.

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विस्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **32619447406** स्वराज बहुउद्द्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने पाठवावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून -शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई-४१०२१० या पत्यावर पाठवावा.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ----------------------------------------------------------------

पत्ता :-------------------------------------------------------------

---------------------------------- पीनकोड ☐☐☐☐☐☐

मोबाईल : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: -------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /-------------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

सभासद कोड नंबर ☐ **कार्यालयीन उपयोगासाठी** मासिक वर्गणी नंबर ☐

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक [ / / २०१२ ] मुदत समाप्तीचा दिनांक [ / / २०१३ ]
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------- / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये ☐ मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- आपण वेबसाईट **rtimahasangh.weebly.com** वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता

लखलखते तारे पाहण्यासाठी अंधारात राहवं लागत.

## केंद्रीय माहिती अधिकार कायदा कलम ४(१)ख नुसार

## प्रत्येक शासकीय कार्यालयात खालील माहिती प्रदर्शित करणे बंधनकारक आहे

१.आपली रचना,कार्ये आाणि कर्तव्ये यांचा तपशील.

२.आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये.

३.निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली

४) स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्याकडून ठरविण्यात आलेली मानके

५) त्यांच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम,विनियम,सूचना,नियमपुस्तीका आणि अभिलेख

६) त्यांच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गांचे विवरण

७) आपले धोरण तयार करायच्य किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात,लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील

८)आपल्या एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून गठीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच मिळून बनलेल्या मंडळांचे,परिषदांचे,समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्यांमंडळांच्या, परिषदांच्या समितांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खूल्या आहेत किंवा कसे याबाबतचे निवेदन किंवा अशा बैठकांची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण

९) आपल्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका

१०) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्यांना मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाम्च्या विनिमयांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याच्या पद्धती

११) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविनारा,आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेल्या अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल

१२) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रक्कमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभधिकाऱ्यांचा तपशील

१३) ज्या व्यक्तीना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील

१४) इलेक्ट्रानिकस् स्वरूपात उपलब्ध असलेल्या किंवा त्यांच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील

१५) माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालवण्यात येत असलेल्या ग्रथांलयांच्या किंवा वाचनालयाच्या वेळांचा तपशील

१६) जनमाहिती अधिकाऱ्यांची नावे,पदनामे आणि इतर तपशील

१७) विहीत करण्यात येईल अशी माहिती प्रसिद्ध करील आणि त्यानंतर ती प्रकाशने अद्ययावत करील

अशी सर्व माहिती प्रत्येक सरकारी कार्यालयाने स्वंयप्रेरणेने जनतेसाठी खूली करायाची आहे. हे कायदेशीर बंधन आहे.जेणे करून नागरिकांना शक्यतो माहिती मागण्यासाठी कोणाकडेही जाण्याची वेळ येणार नाही.

तरी कार्यकर्त्यांना आणि नागरिकांना विनंती करण्यात येते की या संबधांत पूर्तता झाली नसल्याचे आढळून आल्यास संबंधीत कार्यालयाला लेखी पत्र द्यावे तसेच संबधीत कार्यालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (४)क चे पालन केले नसाल्याबद्दल या संबधीत कार्यालयावर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार खालील पत्यावर लेखी स्वरूपात करावी.

राज्य माहिती आयोग
प्रशासकीय इमारत १३ वा मजला
मंत्रालयासमोर, मुंबई ४१०००१

भाकरी आपल्याला जगविते आणि गुलाबाचं फुल का जगायच ते सांगतं

# चारा छावणीत चोरी होऊ नये मुक्या प्राण्यांचा घास आरटीआयच्या माध्यमातून होऊ शकतो पर्दाफाश

केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी
जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग / जिल्हाधिकारी कार्यालय
----------------------------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :-------------------------------------------

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :(विषय व कालावधी)
----------- या गावातील जनावराच्या चारा छावणीच्या विषयीची माहिती मिळणेबाबत.
खालील मुद्येनिहाय माहिती मिळणेबाबत

अ) ---------- येथील छावणी किंवा चारा डेपो कधी सुरू झाला.चारा वाटपाचे निकष काय आहेत ?नियम व निकषाची प्रत मिळावी

ब ) सदर चारा वितरण वा छावणी कोणत्या संस्थेच्या माध्यमातून सुरू झाली आहे ? शासन व संस्था यांच्यातील कराराची प्रत द्यावी

क) जनावराच्या छावणीमध्ये किती शेतकऱ्यांची किती जनावरे केव्हा दाखल झाली.

ड) प्रती जनावर प्रती दिन चाऱ्यासाठी किती रूपये मंजूर झाले ? चारा खरेदीवर किती रूपये खर्च झाले ? शासनाकडून किती रूपये मिळाले ?

इ) छावणीमध्ये संपूर्ण काळात एकूण किती दिवस किती जनावरे राहिले ? किती टन शेण मिळाले ? शेणाचा लिलाव झाला काय ? छावणीतील जनावराच्या शेणामधून किती रूपये प्राप्त झाले ?

४) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

५) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (सोबत १० रूपयाची पोस्टल ऑर्डर जोडली आहे)

ठिकाण :------------- अर्जदाराची सही

दिनांक : - - २०१३

नाव --------------

मो. ----------------

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,महाराष्ट्र

## स्वराज आंदोलन नागरिक अधिकार

### आता इंटरनेटवर ही उपलब्ध !

### rtimahasangh.weebly.com

नागरिक अधिकार मासिकांचे जूने अंक

माहिती अधिकार महासंघाच्या सभासदांची यादी

नव्या घटना व घडामोडीची आवश्यक ती माहिती

ऑनलाईन सभासद नोंदविण्यांची सोय



व्यवस्था परिवर्तनाचा नवा एल्गार

सुभाष बसवेकर यांचे नवे क्रांतीकार पुस्तक

**ग्रामसभेला व्यापक अधिकार द्या.**
**देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील ५० वाटा**
**ग्रामसभा व वार्डसभा यांना द्या**
**लोकप्रतिनिधींचे विशेषाधिकार कमी करा**
**संपूर्ण शासकीय व प्रशासकीय व्यवस्था ऑनलाईन करा**

प्रसिद्ध झाले !
किंमत २० रूपये
कार्यकर्त्यांनी एकत्रीत किमान२०० रूपये
भरून दहा पुस्तके मागविल्यास
पोष्टाने पाठविणे किफायतशीर ठरेल.
मो.९२२३५१६९२०





अश्रू येणं हे माणसाला हृदय असल्याचे द्योतक आहे

# नागरिकांची सनद पूरवठा खाते

**कामे पूर्ण करण्यासाठी कालामर्यादा**

या शिधापत्रिकांसबंधीची नागरिकांची कामे तहसील पुरवठा शाखेतून पूर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे कालमर्यादा विहित करण्यात आली

| न. | कामाचे स्वरुप (१) | कालमर्यादा (२) |
|---|---|---|
| १. | नवीन शिधापत्रिका देणे (राज्यांतर्गत बदल व पुरावा असल्यास) | ७ दिवस |
| २. | इतर राज्यातून आलेल्या अर्जदारास नवीन तात्पुरती शिधापत्रिका देणे | १५ दिवस |
| ३. | शिधापत्रिकेत नाव वाढविणे. | ७ दिवस |
| ४. | शिधापत्रिकेत नवीन जन्मलेल्या मुलाचे नाव वाढविणे. ( जन्म दाखल्यासह) | १ दिवस |
| ५. | शिधापत्रिकेत नोंद असलेल्या लहान मुलांचे एकांक वाढविणे. | १ दिवस |
| ६. | हरवलेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे. | १० दिवस |
| ७. | फाटलेल्या / खराब झालेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे. | ३ दिवस |
| ८. | शिधापत्रिकेवरील पत्त्यातील बदल (त्याच रास्त भाव दुकानाच्या व तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात). | ७ दिवस |
| ९. | शिधापत्रिकेवरील पत्त्यातील बदल. (तहसील कार्यालयात बदल असल्यास). | नवीन तहसील कार्यालयात अर्ज व जुनी शिधापत्रिका दिल्यापासून ७ दिवस |
| १०. | शिधापत्रिकेतील नाव कमी करणे व तसे प्रमाणपत्र देणे | १ दिवस |
| ११. | शिधापत्रिका रद्द करून तसे प्रमाणपत्र देणे | १ दिवस |

परिक्षा म्हणजे स्वत:ला आत डोकावून पाहण्याचे संधी !


## सरकारी अद्यादेश जारी ,पण अंमलबजावणी होणार काय ?

# आरटीआय कार्यकर्त्यांना मोफत सरंक्षण



माहिती अधिकार कायद्याचा वापर करून प्रशासन अधिकाधिक जबाबदार आणि पारदर्शी राहावे म्हणन महाराष्ट्रात हजारो सामाजिक कार्यकर्ते सक्रीयपणे माहितीच्या अधिकाराचा उपयोग करीत आहेत. नदीतले किंवा झऱ्यातले गढूळपाणी स्वच्छ करण्याचे काम जसे पाणनिवळी करते तसेच हे कार्यकर्ते प्रशासनातील गढूळपणा कमी करण्याचे कार्य करीत आहेत.

प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी आणि हितसंबधीय राजकीय दलाल,भ्रष्ट ठेकेदार यांनी माहिती अधिकार कार्यकर्त्यांना लक्ष्य ठरविले आहे.गेल्या आठ वर्षात महाराष्ट्रात सुमारे दहा ते बारा कार्यकर्त्यां हत्या झाल्याअसून शेकडो कार्यकर्त्यांवर शारिरीक हल्ले झाले आहेत.आता उच्च न्यायालयाच्या आदेशाने शासनाने अद्यादेश काढला आहे.परंतु समाजिक कार्यकर्ते हे सत्ताधाऱ्यांसाठी नेहमीच हितसंबधातील अडथळे ठरत असल्याने या जी.आर.ची अंमलबजावणी कितपत होईल हा संशोधनाचा विषय आहे.



Office of the Commissioner of Police, Mumbai.
Jt. C.P. (L&O)-
Addl. C.P.
D.C.P.
Reader
P.A.
I.W. NO. 4121/RB/dtd. 27/9/11.

राज्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी मागणी केल्यास द्यावयाच्या पोलीस संरक्षण देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
शासन परिपत्रक क्र. सीआरटी -२०१०/प्र.क्र.६४/पोल-११
दिनांक :- २२ सप्टेंबर, २०११

संदर्भ :- १) गृह विभाग, शासन परिपत्रक क्र.सीआरटी-२०१०/प्र.क्र६४/पोल-११,दि.०९/०२/२०१०.
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीआरटी-२०१०/प्र.क्र६४/पोल-११,दि.१५/०२/२०११.
३) गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीआरटी-२०१०/प्र.क्र६४/पोल-११, दि.०६/०४/२०११. (शुध्दीपत्रक)

राज्यातील विविध भागातील सामाजीक कार्यकर्ते त्यांच्या क्षेत्रात कार्य करीत असतांना विशिष्ट कामात हितसंबंध गुंतलेल्या समाज कंटकांकडून अशा सामाजीक कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ले होण्याच्या घटना घडतात. अशावेळी अशा कार्यकर्त्यांना पुरेसे पोलीस संरक्षण नसल्यास अशा घटनांत त्यांचा मृत्युही होण्याच्या घटना घडतात. भविष्यात अशा घटना होऊ नयेत म्हणून अशाच एका प्रकरणी राज्य शासनाने सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी मागणी केल्यास, परिस्थितीचे गांभीर्य विचारात घेऊन त्यांना पोलीस संरक्षण देण्यात येईल. अशा आशयाचे प्रतिज्ञा पत्र मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सादर केले आहे.

२. त्या अनुषंगाने, राज्यातील जे सामाजिक कार्यकर्ते सामाजिक हितासाठी कार्य करत आहेत व त्यांच्या कामाचे स्वरुप समाज उपयोगी आहे याबाबतची खातरजमा करून त्यांना पोलीस संरक्षणाची आवश्यकता आहे. अशी शासनाने नियुक्त केलेल्या समितीची खात्री झाल्यास अशा सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वत:साठी पोलीस संरक्षणाची मागणी केल्यास त्यांना पोलीस संरक्षण निशुल्क देण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सरंक्षण शाखा- १, मुंबई.

( ज्यो. मा. चव्हाण )
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव,
अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक,
प्रधान सचिव (विशेष) गृह, यांचे स्वीय सहायक,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त/उपआयुक्त,
सर्व पोलीस अधीक्षक/उपअधीक्षक.

26 SEP 2011


पो. आ. मुंबई यांचे कार्यालय,
नोंदणी क्र. 91-7973

I.W. NO. / DATE.
ADDL. C.P. (P & S)
PROT / SEC

खरी नक्कल
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सरंक्षण शाखा- १, मुंबई.

# आमदार -खासदार विकास निधी बंद करा

# प्रत्येक गावाला ग्रामसभा विकास निधी द्या



आमदार आणि खासदार यांना दरवर्षी दिला जाणारा विकास निधी हा लोकप्रतिनिधीसाठी दुभती गाय बनला आहे.या निधीपैकी ९० टक्के निधी हा राजकीय उदद्येशाने उपयोगात आणला जातो.त्यामुळे हा निधी थेट प्रत्येक गावातील ग्रामसभे कडे वळता करावा आणि मग या निधीतून गावाचा विकासाची कामे मार्गी लावण्याचे कार्य ग्रामसभा अधिक चांगल्या प्रकारे करेन असा मतप्रवाह आहे

ज्यांना मनापासून समाजसेवा करायची आहे.राजकारण हे समाज विकासाची प्रक्रिया आहे असे जे मानतात असे राजकारणी फार कमी आहेत. ते वगळता अन्य कोणी एक राजकारणी खासदार आणि आमदार होण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च का करतात ?प्रसंगी गुंडागर्दी करणे,मतदार विकत घेणे,दारू व पैसे वाटणे असे अनेक नको ते उद्योग का करतात ?एक साधे गणित मांडा्केवळ खासदार किंवा आमदार होवून फक्त समाजसेवाच करायचीअसेल तर कष्टाच्या कमाईचे कोणी पाच कोटी रूपये खर्च करील काय ?पाच कोटी खर्च करून ५० ते ५०० कोटीवर डल्ला मारण्याची सुवर्णसंधी दिसते म्हणून तर इतका आटापिटा करून निवडून यायचे आहे. कारण दिल्ली आणि मुंबईतील सत्तेचा चावी म्हणजेचखासदार आणि आमदार होणे होय.सत्ता कारणात या आमदार आणि खासदारांना विशेष अधिकार मिळतात.आमदार खासदार झाले की देशाच्या विकास प्रक्रियेतील धोरणात आपल्या मनमानी पद्धतीने प्रभाव टाकून आपला फायदा मिळवून घेता येतो.अमाप सवलती मिळतात.विकासांच्या नावाखाली अनेक प्रकारची कंत्राटे व ठेके आपल्याच बगलबच्यांना मिळवून डमी कंत्राटदारी चालवून प्रचंड पैसा उभा करता येतो. गरीबाच्या नावाखाली चालणाऱ्या अनेक समाजकल्याणकारी योजनात नको तितका हस्तक्षेप करून या योजनांचा पैसा मनमुराद हाणता येतो. तोडांत लोककल्याण आणि खिशा आत्मकल्याण

# विकास निधी बंद करा

हे धोरण ठेवावे.जीभ नरम आणि खिसा गरम ही नीती उपयुक्त ठरते. लोकांची सेवा करणे हे वरवरचे थोंताड असते खरे कारण मेवा खाणे हेच असते. जर खासदार आणि आमदारांना विशेषाधिकार मिळाले नाहीत. जर कंत्राट आणि ठेके कोणाला मिळणार यांत त्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंधच ठेवला नाही.सरकारी योजनात आमदार अणि खासदारांचा हस्तक्षेपच ठेवला करण्याची संधी दिली नाहीतर ........लाल दिव्यांची गाडी,भव्य दिव्य सुरक्षा व्यवस्थेचा डामडौल...,मोफत व सवलती मध्ये रेल्वेचा प्रथमवर्गाचा रेल्वेप्रवास, सवलतीमधील विमान प्रवास, प्रवास व आणि भोजन भत्ते, उपस्थिती भत्ते, परदेशागमनासारख्या विपूल संधी,कार्यालयतील पीए,अन्य कर्मचाऱ्यांचे पगार,प्रशासनातील नोकर वर्गाच्या बदल्या करण्याचे अधिकार,बदल्या न करण्याचे अधिकार, संसद व विधीमंडळात विविध कमिट्यावर राहून कोर्पोरेट लॉबी च्या हिताची धोरणे आखण्यासाठी,कार्पोरेट लॉबीच्या हिताचे कायदे करण्यासाठी असे लॉबीग करण्यासाठी,अशा लॉबी मध्ये राहण्यासाठी मिळणारा मलिदा करोडो मध्ये असतो.खासदार आणि आमदार यांच्याकडे असलेले बहुतांश विशेषाधिकार जर काढून ते थेट ग्रामसंभेला जर दिले तर.तर म्हणजेच मेवा खाण्याचीच संधी जर ठेवली नाही तर आमदार अणि खासदार होण्याची फुकट पाटीलकी कोणीच करणार नाही.स्वीडन,कॅनडा या देशातील लोकप्रतिनिधी मंत्री साध्या घरात राहतात,पब्लिक टॉन्सपोर्ट ने प्रवास करतात.प्रोटोकॉल च्या नावाने तेथे उधळपट्टी नसते.आमच्या गरीब देशात मात्र लोकप्रतिनिधी कार्यालयातील पडदे,पलंगपोस आणि फर्निचरसाठी करोडो फुकतात. लोकप्रतिनिधीचे हे लाड थांबविणे ही काळाची गरज आहे.सरळ गणित आहे.जर खासदार आणि आमदारांना असणारे विशेषअधिकार कमी केले तर ना निवडणूकीत मते विकत घेतली जातील,ना पैशाचा बाजार होईल ना घोड बाजार होईल ना मतदान केंद्रे बळकावले जातील ना बोगस मतदान होईल. असे झाले तर ना राईट टू रिकॉल अणिना राईट टू रिजेक्टची गरज राहणार नाही.तेव्हा खासदार आणि आमदारांचे थेट लोकांच्या प्रश्नांशी जाडले गेलेले सर्व विशेषाधिकार काढून संपवावेत.तशी कायद्यात दुरूस्ती करावी अणि हे काढलेले अधिकार थेट ग्रामसभेला द्यावेत.या प्रश्नावर जनमताचा दबाव आणणे ही देशहितासाठी काळाची गरज आहे.

वाहतो तो झरा आणि सांचत ते डबकं, डबक्यावर डास येतात अन् झऱ्यावर राजहंस !

# आमदार विकास निधीचा हिशेब तपासण्यासाठी माहिती अधिकाराचा नमूना

## केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

(जोडपत्र "अ" नियम ३ पहा )

प्रति,

जनमाहिती अधिकारी

जिल्हाधिकारी कार्यालय

---------- जिल्हा.

१) अर्जदाराचे नांव - -----------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :-------------------------------------------------------

३) माहितीचा विषय :----------- या मतदार संघातील आमदारांच्या विकास निधीची माहिती

४) माहितीचे वर्णन आणि कालावधी (खालील मुद्याप्रमाणे)------------ मतदारसंघातील आमदार श्री / श्रीमती -------------------- यांच्या ---------- पासून आज तारखेपर्यंतच्या आमदार विकास निधीचा मंजूरी,विकासकामे,खर्च व नियमनाची खालील मुद्येनिहाय माहिती मिळणेबाबत

अ) आमदार निधीतून कोणकोणती कामे पूर्ण झाली ?कोणकोणती कामे चालू आहेत ? कोणकोणती कामे प्रस्तावित आहेत.प्रत्येक विकास कामावर किती निधी खर्च झाला ? खर्च झालेला वर्ष निहाय निधी तसेच न वापरलेला शिल्लक निधी किती आहे? यांची माहिती द्यावी.

ब) आमदार विकास निधीचे प्रत्येक काम कोणत्या ठेकेदारास देण्यात आले? त्या साठी निविदा मागविलया होत्या काय? प्रत्येक कामाच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता द्यावा

क) आमदार विकास निधी वापर कोणत्या कारणासाठी व कसा करावा या विषयीचे शासनाचे नियम, नियमन, कायदा किंवा अद्यादेश यांच्या सत्यप्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

ड) आमदारांनी विकासकामासाठी विनंती किंवा आदेश दिल्यानंतर काम पूर्ण होईपर्यंत कामाची प्रक्रिया कशी असते ?कामाची मंजूरी ते काम पूर्ण होईपर्यतचे निकष काय असतात ?

ई ) आमदार विकास निधीमधून कोणकोणती कामे करावीत याचे काही प्राधान्यक्रम शासनाने ठरवले आहेत काय ?

फ)

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती मी व्यक्तीशः घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : (नाव : )

दिनांक : मोबाईल नंबर

शेवटचे पान ..

प्रेरणा

# देवा, ह्याही देशात पाऊस पाड !

देवा ह्याही देशात पाऊस पाड
जेथे पाण्याला येतो खूनाचा वास
जेथे हिंसेच्या मळयात पिकतो ऊस किंवा ताग
देवा, जेथे तू आहेस तोवर निषिध्द आहे वैताग
देवा ह्याही देशात पाऊस पाड

जिथे माणसांच खत घालून समाज उगवतात
जिथे बळी जाणारे तुझ्यावर विस्वास ठेवतात
आणि बळी घेणारे तुझेच आवतार असतात
देवा,ह्याही देशात पाऊस पाड

जिथे दुष्काळही नशीब फळवून जातात
जिथे माणूसकीची यंत्र अखंड चालू असतात
जिथे परोपकाराचा ओव्हरटाईम सदैव चालू असतो
देवा, ह्याही देशात पाऊस पाड
कारण येथे भरपूर खाणारे गाणी गातात
आणि उपाशी मरणारे त्यांना साथ देतात
जिथे दुष्काळ आणि सुकाळ एकत्र नांदतात
देवा, ह्याही देशात पाऊस पाड

-दिलीप पुरूषोत्तम चित्रे

प्रति,

पोष्ट परवाना. No.G/NMD/128/2012-14

पाठविणार
पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर -१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फॅलट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
रजि नं. MAHMAR/2011/40781